**ग्रामीण कृषी मौसम सेवा**
भारत मौसम विभाग
सुविड फाउंडेशन, रिसोड
वाशिम

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 18-03-2025**

**वॉशिम(महाराष्ट्र) साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2025-03-18 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2025-03-19 | 2025-03-20 | 2025-03-21 | 2025-03-22 | 2025-03-23 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 0.0 | 0.0 | 0.0 | 15.5 | 0.0 |
| कमाल तापमान (अं.से) | 37.9 | 37.8 | 36.5 | 36.9 | 36.5 |
| किमान तापमान (अं.से) | 25.7 | 26.3 | 25.5 | 24.9 | 24.8 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 52 | 55 | 64 | 45 | 43 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 34 | 33 | 40 | 28 | 25 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 14 | 11 | 18 | 14 | 11 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 210 | 230 | 90 | 335 | 50 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 2 | 6 | 6 | 5 | 2 |
| चेतावणी | कोई चेतावनी नहीं | कोई चेतावनी नहीं | कोई चेतावनी नहीं | आंधी और बिजली, तूफ़ान आदि; तेज़ सतही हवाएँ | कोई चेतावनी नहीं |

## भविष्यवाणी सारांश:

भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या मूल्यवर्धित अंदाजानुसार, वाशीम जिल्ह्यामध्ये, पुढील ५ दिवस दिनांक १९ ते २३ मार्च २०२५ दरम्यान आकाश निरभ्र ते आंशिक ढगाळ राहील. दिनांक १९ ,२० २१ आणि २३ मार्च २०२५ रोजी हवामान कोरडे राहण्याची अधिक शक्यता, दिनांक २२ मार्च २०२५ रोजी तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची अधिक शक्यता वर्तविण्यात आली आहे. • पुढील ५ दिवसांत, कमाल तापमान ३६.५ ते ३७.९ अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे, तर किमान तापमान २४.८ ते २६.३ अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे.

## हवामान चेतावणी (पुढील दिवशी 08:30 IST पर्यंत वैध):

• दिनांक २२ मार्च २०२५ रोजी वादळी वाऱ्यासह (४०-५० किमी/तास), मेघगर्जना व विजांचा कडकडाट होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## हवामान चेतावण्यांचे कृषीवरील संभाव्य प्रभाव आणि संबंधित एग्रोमेट सल्ले:

मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट मुळे पशुधन, शेतकरी किंवा शेतमजुरास इजा अथवा मृत्यू होऊ शकतो. वादळी वाऱ्यामुळे झाडांवरील फळांची गळ होऊ शकते, गोठा अथवा शेतात साठवलेला चाऱ्याचे नुकसान होऊ शकते. पावसा मुळे परिपक्व अवस्थेतील पिकाचे नुकसान होऊ शकते तसेच प्रत खराब होऊ शकते. पावसामुळे कृषी उत्पन्न बाजार समिती अथवा खुल्या बाजारामध्ये शेतकऱ्यांद्वारा विक्रीसाठी आणलेला शेतमाल पावसाच्या संपर्कात खराब होऊ शकतो.

## कृषि सल्ला:

| |
|---|
| • पुढील ७२ तासानंतर संभाव्य पावसाचा अंदाज लक्षात घेता, परिपक्व अवस्थेतील गहू आणी करडई तसेच इतर रब्बी हंगामातील पिकाची कापणी व मळणी ची कामे पुढील ७२ तासांपूर्वी उरकून घेण्यास प्राधान्य द्यावे. कापणी केलेला शेतमाल कोरड्या व सुरक्षित ठिकाणी साठवावा. मळणी ची कामे शक्य नसल्यास कापणी केलेला शेतमाल प्लास्टीक शीट किंवा ताडपत्रीच्या सहाय्याने झाकून ठेवावा. • हंगामी पिके, फळबागा, भाजीपाला पिकामध्ये आंतरमशागतीची कामे (डवरणी, खुरपणी इत्यादी.), कीड व रोग व्यवस्थापनासाठी कृषी रसायनांची फवारणीची कामे व उभ्या पिकामध्ये खते देण्याची कामे पुढील ३ दिवसापुर्वी उरकून घेण्यास प्राधान्य द्यावे. • मेघगर्जना, विजांचा कडकडाट व वादळी वाऱ्याचा अंदाज लक्षात घेता पशुधनास उघड्यावर चराई क्षेत्रावर चरावयास सोडणे टाळावे. जनावराना गोठया मध्येच चारा व पाण्याची व्यवस्था करावी. शेतात काम करताना मेघगर्जनेची चाहूल लागताच तात्काळ सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. जिल्ह्यातील मागील घटनांचा संदर्भ लक्षात घेता मेघगर्जनेच्या वेळी पळस, कडूनिंब तसेच ईतर कोणत्याही झाडाखाली आश्रय टाळावा. • वादळी वाऱ्याचा अंदाज लक्षात घेता बाजारायोग्य फळे तसेच भाजीपाला पिकाची काढणी करून विक्री करावी. फळझाडांना बाबूच्या सहाय्याने आधार द्यावा. • कृषी उत्पन्न बाजार समिती अथवा खुल्या बाजारामध्ये शेतकरी बांधवाद्वारा विक्री साठी आणलेल्या शेतमालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतमाल हा उघड्यावर साठवणे टाळावे, शेतमाल हा शेड मध्येच साठवावा. |

## संक्षिप्त संदेश सल्ला:

| |
|---|
| • दिनांक २२ मार्च २०२५ रोजी वादळी वाऱ्यासह (४०-५० किमी/तास), मेघगर्जना व विजांचा कडकडाट होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. |

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| करंडई | •परिपक्वकरडई पिकाची काढणी,मळणी करून सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी.•मळणीची कामे शक्य नसल्यास शेतमाल पावसाच्या संपर्कात येणार नाही याची काळजी घ्यावी तसेच कापणी केलेला शेतमाल ताडपत्री किंवा प्लास्टिक शीटच्या सहाय्याने झाकून ठेवावा. |
| गहू | • परिपक्व अवस्थेतील गहू पिकाची काढणी करून घ्यावी व काढणी आणि मळणी केलेले पिक सुरक्षित आणि कोरड्या ठिकाणी साठवणूक करावी. •मळणीची कामे शक्य नसल्यास शेतमाल पावसाच्या संपर्कात येणार नाही याची काळजी घ्यावी तसेच कापणी केलेला शेतमाल ताडपत्री किंवा प्लास्टिक शीटच्या सहाय्याने झाकून ठेवावा. |
| तीळ | •जमिनीच्या मगदुरा प्रमाणे तीळ पिकाला ओलीत करावे तसेच ओलीत करतांना पिकात पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी. •उन्हाळी तीळ पिकास आवशकतेनुसार २ ते ३ कोळपण्या/निंदन/खुरपण्या देऊन तिळाचे पिक एक महिण्याचे होईपर्यंत तणमुक्त ठेवावे. |
| भुईमूग | •उन्हाळी भुईमुग पीकात अवश्यकतेनुसार व पिकाच्या गरजेनुसार पाणी व्यवस्थापन करावे. •भुईमुग पिक वाढीच्या सुरुवातीच्या ६ ते ७ आठवडे कालावधी मध्ये आंतरमशागत करून शेत भूसभुशीत ठेवण्याकरीता आवशकते नुसार निंदणी आणी डवरणी/कोळपणी करा. •आऱ्या सुटू लागल्यानंतर (पेरणीनंतर ३५ ते ४० दिवस) आंतरमशागतीची कामे करू नयेत. फक्त मोठी तणे उपटून टाकावी, म्हणजे शेंगा पोसण्याचे प्रमाण वाढेल. •उत्पादनवाढीकरीता ५० टक्के फुलोरा अवस्थेत हेक्टरी ३०० ते ५०० किलो जिप्सम देण्यासाठी नियोजन करावे. •उन्हाळी भुईमुग पिकास आऱ्या सुटण्यापूर्वी डवऱ्याच्या जानकुळास दोरी बांधून मातीची भर द्यावी. •उन्हाळी भुईमूग पिकावर रस शोषण करणाऱ्या किडीच्या नियंत्रणाकरीता इमीडाक्लोप्रीड १७.८ टक्के एस.एल.२.५ मिली किंवा क्वीनॉलफॉस २५टक्के इसी १४ मिली यापैकी कोणत्याही एका कीटकनाशकाची १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. •उन्हाळी भुईमूग पिकावरील तांबेरा व टिक्का या रोगाचे व्यवस्थापन करण्यास टेबुकोनोझोल २५ टक्के डब्लू.जी ५००-७५० ग्रॅम प्रती हेक्टरी ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फवारणीची कामे हि स्वच्छ व शांत हवामान असताना करावी. |

## फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| कांदा | • पिकाची पाण्याची गरज, जमिनीचा प्रकार व सध्याचे हवामान लक्षात घेऊन कांदा पिकामध्ये ओलिताचे नियोजन करावे. •कांदा पिकामध्ये मर/पानांवरील चट्टे या बुरशीजन्य रोगाच्या |

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | व्यवस्थापनासाठी मॅन्कोझेब ७५ % डब्ल्यू.पी.२५ ग्रॅम + सॅन्डोव्हीट स्टीकर ५० मिली/१० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| टरबूज | •टरबूज/खरबूज च्या लागवडीनंतर पिक स्वच्छ व निरोगी राहण्यासाठी २-३ निन्दन द्यावे.• तापमानातील वाढ व पिकाची गरज लक्षात घेतादर ६ ते ८ दिवसांनी ओलीत करावे.जमिनीचा मगदूर व पिकाची गरज यानुसार दोन ओलीतातील अंतर कमी जास्त करावे. •नाग अळीच्या नियंत्रणासाठी प्रोपेनोफोस २० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच फळ माशीच्या नियंत्रणासाठी क्युलूर चे एकरी ५ सापळे लावावेत. •फळ धारणा झाल्यावर वेलीवरील फळे हि गवत किंवा पालापाचोळ्याच्या सहाय्याने एकून टाकावी. |
| संत्रा | • वादळी वाऱ्याचा अंदाज लक्षात घेता झाडांना बांबूच्या सहाय्याने आधार द्यावा. बाजारायोग्य फळांची काढणी करून विक्री करावी. • मार्च महिन्यात तापमान वाढ झाल्यामुळे १-४, ५-७, ८ वर्षे आणि त्यावरील वयाच्या झाडांना दररोज अनुक्रमे १२-५३, ७८- १२७ आणि १४५-१८० लिटर पाणी ठिबक सिंचन पद्धतीद्वारे द्यावे. दुहेरी आळे पद्धत अवलंब करावा आणि बगीच्यास ७ ते १० दिवसाच्या अंतराने ओलीत करावे. झाडांच्या आळ्यांमध्ये आच्छादनाचा वापर करावा. • या महिन्यात झाडाच्या खोडावर फायटोप्थोराची लक्षणे आढळल्यास खोडाचा प्रभावित भाग चाकूच्या सहाय्याने खरडून घ्यावा. पृष्ठभाग पोटॅशियम परमॅंगनेट द्रावणाने धुवा आणि त्यावर मेफेनोक्साम एमझेड-६८ ची पेस्ट लावावी. संपूर्ण झाडावर मेफेनोक्साम एमझेड- ६८ @ २.५० ग्रॅम/लिटर किंवा फॉसेटाइल एएल @ २.५ ग्रॅम/लिटर पाणी या प्रमाणात बुरशीनाशकाची फवारणी करा. • ब्रशच्या सहाय्याने झाडाच्या खोडावर ६० सेमी उंचीपर्यंत बोर्डो पेस्ट लावावी. • सिट्रस सिला आणि पाने गुंडाळणाऱ्या अळी या किडीचा प्रादुर्भाव झाल्यास, डायमेथोएट १.५ मिली किंवा इमिडाक्लोप्रिड ०.५ मिली किंवा क्विनालफॉस २ मिली किंवा थायमेथोक्साम ०.३ ग्रॅम प्रती एक लिटर पाणी या प्रमाणात मिसळून फवारणी करावी. १५ दिवसांच्या अंतराने पुन्हा फवारणी करा. • फळातील रस शोषणाऱ्या पतंग या किडीचा प्रादुर्भाव झाल्यास, क्विनालफॉस २ मिली किंवा फेनव्हॅलेरेट १ मिली प्रती एक लिटर या प्रमाणात मिसळून पाण्यात फवारणी करावी. १५ दिवसांनी पुन्हा फवारणी करावी. • आंबिया बहरातील फळगळ रोखण्यासाठी २, ४- डी, १.५ ग्रॅम आणि १ किलो युरिया १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • तापमानात ३५ ते ४० अंश सेल्सिअस वाढ झाल्यास २, ४-डी १.५ ग्रॅम आणि पोटॅशियम नायट्रेट १ किलो १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| टोमॅटो | • वादळी वाऱ्याचा अंदाज लक्षात घेता झाडांना बांबूच्या सहाय्याने आधार द्यावा. बाजारायोग्य फळांची काढणी करून विक्री करावी. |
| मिरची | •मिरची पिकात रस शोषण करणाऱ्या किडींच्या प्रादुर्भाव दिसून येत असल्यास त्याच्या व्यवस्थापनासाठी पायरीप्रॉक्सीफेन १०टक्के ईसी ४ मीली किंवा फेनप्रोपाथ्रीन १०टक्के ईसी ४ मीली प्रती १० लिटर पाण्यात मीसळून फवारणी करावी.• मिरची लागवड करून एक महिना पूर्ण झालेल्या उत्पादकांनी मिरची पिकाला ३७.५ किलो नत्र प्रतीहेक्टरी द्यावे.• फुलांची गळ कमी करण्यासाठी प्लॅनोफिक्स ५ मि.ली., ९ लिटर पाण्यात मिसळून मिरचीलागवडीनंतर ५० व ७० दिवसांनी फवारणी करावी.• मिरचीवरील फुलकिडीच्या व्यवस्थापनासाठी निळे चिकट सापळे लावावेत.आर्थिक नुकसान पातळी ओलांडल्यास इमामेक्टीन बेंझोएट एस.जी.@४ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| भेंडी | • उन्हाळी भेंडी पिकावर तुडतुडे व मावा रसशोषक किडींचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने रसशोषक किडींच्या व्यवस्थापनासाठी पिकामध्ये पिवळे चिकट सापळे लावावेत. प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १५ मि.ली. किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि. ली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| हळद | पावसाचा अंदाज लक्षात घेता, हळद पिकाची काढणी करून शिजवल्यानंतर (Boiling) उघड्या जागेत वाळवायला न ठेवता शेड मध्ये वाळवावी. • शेडची व्यवस्था नसल्यास, मोकळ्या जागी ठेवलेला शेतमाल झाकण्यासाठी ताडपत्री किंवा प्लास्टिक शिट ची व्यवस्था करावी. |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| गाय | मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट, वादळी वारे , पाऊस होण्याची शक्यता लक्षात घेता गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्याव इतर पाळीव जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. |

## कुकुटपालन विषयक निहाय सल्ला:

| कुकुटपालन विषयक | कुकुटपालन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| पक्षी | • कोंबड्याच्या शेडशे मध्ये हवा खेळती राहण्यासाठी व्हेंटीलेटर्स ( रुंद खिडक्या) ची व्यवस्था करावी तसेच उन्हाळ्यातील उष्णतेपासून त्यांना इजा होऊ नये म्हणून शेड / छतावर गवत पसरवावे. अधूनमधून या गवतावर पाणी शिंपडावे त्यामुळे शेडच्या आतील तापमान नियंत्रित राहण्यास मदत होईल. • उष्णतेपासून त्रास होऊ नये म्हणून उन्हाळ्यात कोंबळ्याना खाद्य सकाळी आणि संध्याकाळ च्या वेळेत द्यावे. • कोंबड्यांच्या सर्व पिल्लांना खाद्य समान मिळेल यासाठी खाद्याचे भांडे दिवसातून दोन वेळा भरून ठेवावे. |

## इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|
| माती चाचणी | रबी पिकाची काढणी केल्यानंतर परंतु जमिनीची मशागत करण्यापूर्वी शेतकऱ्यांनी आप आपल्या शेतातील मातीचे नमुने शास्त्रीय पद्धतीने गोळा करून माती परीक्षणा करिता माती परीक्षण शाळेत द्यावे व नंतर जमिनीची खोल नांगरणी करावे . माती परीक्षण अहवालानुसार शेतकऱ्यांना योग्य खत व्यवस्थापन करून चांगले उत्पादन घेता येते व रासायनिक खतांवर होणारा अवाजवी खर्च टाळता येतो. |

## हवामान चेतावण्यांचे संभाव्य प्रभाव (सामान्य):

| |
|---|
| मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट मुळे पशुधन, शेतकरी किंवा शेतमजुरास इजा अथवा मृत्यू होऊ शकतो. वादळी वाऱ्यामुळे झाडांवरील फळांची गळ होऊ शकते, गोठा अथवा शेतात साठवलेला चाऱ्याचे नुकसान होऊ शकते. पावसा मुळे परिपक्व अवस्थेतील पिकाचे नुकसान होऊ शकते तसेच प्रत खराब होऊ शकते. पावसामुळे कृषी उत्पन्न बाजार समिती अथवा खुल्या बाजारामध्ये शेतकऱ्यांद्वारा विक्रीसाठी आणलेला शेतमाल पावसाच्या संपर्कात खराब होऊ शकतो. |

## परिणाम आधारित सल्ला (सामान्य):

| |
|---|
| • पुढील ७२ तासानंतर संभाव्य पावसाचा अंदाज लक्षात घेता, परिपक्व अवस्थेतील गहू आणी करडई तसेच इतर रब्बी हंगामातील पिकाची कापणी व मळणी ची कामे पुढील ७२ तासांपूर्वी उरकून घेण्यास प्राधान्य द्यावे. कापणी केलेला शेतमाल कोरड्या व सुरक्षित ठिकाणी साठवावा. मळणी ची कामे शक्य नसल्यास कापणी केलेला शेतमाल प्लास्टीक शीट किंवा ताडपत्रीच्या सहाय्याने झाकून ठेवावा. • हंगामी पिके, फळबागा, भाजीपाला पिकामध्ये आंतरमशागतीची कामे (डवरणी, खुरपणी इत्यादी.), कीड व रोग व्यवस्थापनासाठी कृषी रसायनांची फवारणीची कामे व उभ्या पिकामध्ये खते देण्याची कामे पुढील ३ दिवसापुर्वी उरकून घेण्यास प्राधान्य द्यावे. • मेघगर्जना, विजांचा कडकडाट व वादळी वाऱ्याचा अंदाज लक्षात घेता पशुधनास उघड्यावर चराई क्षेत्रावर चरावयास सोडणे टाळावे. जनावराना गोठया मध्येच चारा व पाण्याची व्यवस्था करावी. शेतात काम करताना मेघगर्जनेची चाहूल लागताच तात्काळ सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. जिल्ह्यातील मागील घटनांचा संदर्भ लक्षात घेता मेघगर्जनेच्या वेळी पळस, कडूनिंब तसेच ईतर कोणत्याही झाडाखाली आश्रय टाळावा. • वादळी वाऱ्याचा अंदाज लक्षात घेता बाजारायो |

**Farmers are advised to download Unified �Mausam� and "Meghdoot" android application on mobile for Weather forecast and weather based Agromet Advisories and "Damini" android application for forecast of Thunderstorm and lightening.**

**Mausam MobileApp link: https://play.google.com/store/apps/details/**

**Meghdoot MobileApp link: https://play.google.com/store/apps/details**

**Damini MobileApp link : https://play.google.com/store/apps/details**